लोकमत

# श्रीमंत मुलांनीच खेळावं का?

क्रीडा विश्वातून



**सुनील वालावलकर**
क्रीडा संघटक

**क्रीडाक्षेत्रात येणाऱ्या १०० खेळाडूंपैकी केवळ एकच यशाचे शिखर पादाक्रांत करतो. बाकीचे ९९ खेळाडू गुणवत्ता असूनही जगण्याच्या स्पर्धेत मागे पडतात. या गुणवान, परंतु कमनशिबी तरुणांच्या मागे पालकांचे पाठबळ आवश्यक असते.**

**सुप्रसिद्ध बॅडमिंटन** प्रशिक्षक पुल्लेला गोपीचंद त्यांच्या स्पष्ट वक्तेपणामुळे क्रीडाविश्व ढवळून टाकतात. शितपेयांच्या जाहिराती करण्यास ठाम नकार देऊन गोपीचंद यांनी अनेक खेळाडूंची कुचंबणा केली होती. क्रीडा जगतातील घडामोडींवरच्या गोपीचंद यांच्या टीका टिप्पणीवर सर्वजण लक्ष ठेवून असतात. त्यांच्या एका ताज्या वक्तव्यावर क्रीडा क्षेत्रातून विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

एका मुलाखतीत गोपीचंद म्हणाले की, 'क्रीडा क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या खेळाडूंचे पालक श्रीमंत असले पाहिजेत. अन्यथा या क्षेत्रात येण्याचे धाडस कोणी करू नये.' अपेक्षेप्रमाणे गोपीचंद यांच्या या वक्तव्यावर उलटसुलट प्रतिक्रिया उमटू लागल्या. परंतु, आपल्या विधानावर ठाम राहून गोपीचंदांनी खुलासा करताना जी वस्तुस्थिती जगासमोर आणली ती प्रत्येकालाच अंतर्मुख करणारी आहे. त्यांच्या मते क्रीडाक्षेत्रात येणाऱ्या १०० खेळाडूंपैकी केवळ एकच खेळाडू यशाचे शिखर पादाक्रांत करतो. बाकीचे ९९ खेळाडू त्यांच्याकडे गुणवत्ता असूनही जगण्याच्या स्पर्धेत मागे पडतात. अशावेळी या गुणवान, परंतु कमनशिबी तरुणांच्या मागे त्यांच्या पालकांचे भक्कम पाठबळ असणे आवश्यक असते आणि म्हणून गोपीचंद म्हणतात की, क्रीडा क्षेत्राव्यतिरिक्त अन्य पर्यायांची खात्री करून मगच क्रीडा क्षेत्रात करिअर करण्यासाठी उतरावे आणि त्यासाठी पालकांची आर्थिक परिस्थिती उत्तम असली पाहिजे.



क्रीडा क्षेत्रातून राखीव नोकऱ्या मिळवणाऱ्यांची पुढे काय स्थिती होते, याविषयी गोपीचंद म्हणाले की, क्रीडांगणात उज्ज्वल कामगिरी करणारे तरुण खेळाडू सरकारी किंवा खासगी नोकरीत एका विशिष्ट मर्यादेपुढे प्रगती करू शकत नाही. कारण, नोकरीच्या ठिकाणी आवश्यक कौशल्य खेळाडूंच्या ठिकाणी असू शकत नाही आणि कार्यालयातल्या उच्च अधिकाऱ्यांना, खेळाडूंच्या मेहनतीची आणि क्रीडा कौशल्याची पुरेशी जाणीव नसते. परिणामी, जागतिक दर्जाच्या खेळाडूची नोकरीच्या ठिकाणी घुसमट होते. नोकरीऐवजी प्रशिक्षण अकादमी सुरू करण्याचे जर का एखाद्या खेळाडूने ठरवले, तर त्यासाठी आवश्यक भांडवली खर्चासाठी पुन्हा त्याला पालकांचीच मदत घेणे अनिवार्य ठरते.

गोपीचंदांच्या एका विधानाने क्रीडाविश्व ढवळून निघत असताना, भारत सरकारच्या क्रीडा मंत्रालयाने एका अभिनव योजनेची घोषणा केली. त्यानुसार जे खेळाडू सरकारी अथवा निम सरकारी आस्थापनांमध्ये नोकरीला लागतील, त्यांना उर्वरीत सेवा कार्यकाळात त्यांच्या क्रीडा कौशल्य विकसित करण्यासाठी चार स्तरांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी मिळणार आहे. साधारण आठ वर्षांच्या कालावधीचा हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर तो खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावरचा मान्यताप्राप्त प्रशिक्षक होऊ शकतो. असा व्यापाक दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवून बनवलेल्या या अभ्यासक्रमात विदेशातील तज्ज्ञ आणि पटियाळा एनआयएस खेळाडूंना मार्गदर्शन करणार आहेत.